## समरी केस क्र.३३३/२०२२.

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (१९७४ चा अधिनियम दोन) प्रकरण एकवीस अन्वये गुन्हयाचे विवरण.

**श्रीमती एस. डी. जवळगेकर, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन यांचे न्यायालयात.**

| | | |
|---|---|---|
| ०१. अपराध घडल्याचा दिनांक | : | ०२/११/२०२२, |
| ०२. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | १२/११/२०२२, |
| ०३. फिर्यादादाराचे नाव. | : | सरकार तर्फे म्हसळा पो. ठाणे. |
| ०४. आरोपीचे नाव, त्याची आई व बापाचे नाव, वय, निवासस्थान इत्यादी. | : | मुखतार हुसेनमिया गणतारे, वय ४० वर्ष, रा. पाबरे, ता. म्हसळा, जि. रायगड. |
| ०५. गुन्हयाचे विवरण :– | : | |

दिनांक ०२/११/२०२२ रोजी १०.०० वाजता अगर त्या सुमारास म्हसळा गावचे हद्दीत, म्हसळा बाजार पेठेत, ता. म्हसळा, जि. रायगड येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील आटो रिक्षा क्र. एम एच ०६ बी व्ही ०९६४ ही सार्वजनिक रस्त्यावर उभी केल्याने म्हसळा बाजार पेठेतुन जाणारे माणगांव व म्हसळा रोडवर वाहतुकीची कोंडी होवून अडथळा व धोका निर्माण होईल असे कृत्य केल्याने तुम्ही भारतीय दंड विधान संहिता कलम २८३ अन्वये गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये केला आहे.

श्रीवर्धन. ( एस. डी. जवळगेकर )
दिनांक : १२/११/२०२२. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीवर्धन.

**आरोपीचे प्रतिकथन –**

प्रश्न ०१. : तुम्हाला पोलीस टिपणांच्या नक्कला मिळाल्या काय ?

उत्तर : होय.

प्रश्न ०२. : तुमच्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप तुम्हाला वाचुन दाखवला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय.

प्रश्न ०३. : तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर : होय.

.........................................

आरोपी मु. हु. गणतारे यांची सही/ अंगठा.

( एस. डी. जवळगेकर )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीवर्धन.

**<u>न्यायनिर्णय</u>**

( घोषित दिनांक १२/११/२०२२ )

सदर आरोपी यांचे विरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम २८३ खाली आरोपाबाबत प्रकरण दाखल केलेले आहे. आरोपी यांनी स्वेच्छेने गन्हा कबुल करुन तसा लेखी अर्ज दाखल करुन दया दाखविणेस विनंती केली आहे. आरोपी यांनी स्वेच्छेने गुन्हा केला असल्यामुळे सरकार पक्षाची फिर्यादीमधील कथन निर्विवादपणे सिध्द झालेले आहे. त्यामुळे

3 ..

आरोपींना सदर गुन्हयाकरीता दोषी धरण्यात येत आहे. आरोपींचे म्हणणे ऐकले. आरोपींचा पहिलाच गुन्हा असल्याचे कागदपत्रावरुन स्पष्ट होते. त्यामुळे आरोपींचा पहिला गुन्हा असल्यामुळे तसेच तो त्याचे कुटुंबातील एकमेव कर्ता / कमवता इसम असल्यामुळे खालील शिक्षा देणे न्याय होईल. करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

:: **आदेश** ::

०१. आरोपी मुखतार हुसेनमिया गणतारे यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये भारतीय दंड विधान संहिता कलम २८३ करीता दोषी धरुन रक्कम रु.२००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र) असा द्रव्यदंड ठोठावण्यात येत आहे. आरोपी यांनी सदर दंडाची रक्कम भरण्यास कसूर केल्यास पाच दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा भोगावयाची आहे.

(खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आले.)

Sonali Dilip Javalgekar
Digitally signed by Sonali Dilip Javalgekar
Date: 2022.11.16 15:06:59 +0530

श्रीवर्धन.          ( एस. डी. जवळगेकर )
दिनांक : १२/११/२०२२.          प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीवर्धन.